आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१३ ऑगस्ट २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- विदर्भ आणि मराठवाड्यात दुग्ध व्यवसाय विकासाला गती देण्यासाठी १४९ कोटी रुपयांचं अर्थसहाय्य देण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- गुंतवणूकदारांना आपत्कालीन परिस्थितीत शंभर टक्के रक्कम परत करण्याचे रिझर्व्ह बँकेचे बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांना निर्देश

- प्रसारण सेवा नियमन विधेयकाच्या मसुद्यावर अभिप्राय आणि सूचना देण्याच्या मुदतीत १५ ऑक्टोबरपर्यंत वाढ

- कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयातल्या महिला निवासी डॉक्टर अत्याचार आणि हत्या प्रकरणी निवासी डॉक्टरांचा संप

**आणि**

- राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे विविध पुरस्कार जाहीर, ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार

**<><><><><>**

पशुपालन आणि दुग्धव्यवसाय विकासाला चालना देण्यासाठी विदर्भ आणि मराठवाड्यातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये दुग्ध विकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं आज घेतला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या प्रकल्पासाठी १४९ कोटी २६ लाख रुपयांचं अर्थसहाय्य मंजूर झाल्याची माहिती पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

मराठवाड्यातल्या खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम आणि देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा, यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट मार्च २०२५ पर्यंत शिथील करण्याचा, राज्यातल्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला. राज्यातल्या शासकीय, खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त अध्यापकांना ठोक मानधन देण्याचा, नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्ष करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. राज्यातल्या ६ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या डांबरीकरणा ऐवजी सिमेंट काँक्रिटीकरणासाठी ३७ हजार कोटी रुपये खर्चाला आज मान्यता देण्यात आली.

**<><><><><>**

बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांनी आपल्या ठेवीदारांना आपत्कालीन परिस्थितीत गुंतवणुकीच्या पहिल्या ३ महिन्यांमध्ये ठेवीची १०० टक्के रक्कम परत करावी असे निर्देश भारतीय रिझर्व बँकेनं दिले आहेत. मुदतपूर्व काढल्या गेलेल्या अशा ठेवींवर व्याज दिलं जाणार नाही, असं रिझर्व्ह बँकेनं काल जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

गुंतवणूकदारांना अन्य कोणत्याही कारणासाठी मुदतपूर्व गुंतवणूक मोडायची असेल, तर मूळ गुंतवणुकीच्या ५० टक्के, अथवा ५ लाख रुपये, यापैकी जी कमी असेल, तेवढी रक्कम काढता येईल, मात्र त्यावर व्याज मिळणार नाही. तसंच बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांनी ठेवींची मुदत संपण्यापूर्वी १४ दिवस ठेवीदारांना त्याबाबतची आगाऊ सूचना द्यावी, असं यात म्हटलं आहे.

गृहकर्ज देणाऱ्या कंपन्यांनी सार्वजनिक ठेवींच्या १५ टक्के मर्यादेपर्यंत तरल मालमत्ता राखणं गरजेचं असल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. हे बदल १ जानेवारी २०२५ पासून लागू होणार असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

खासगी दूरचित्रवाणी वाहिन्यांनी आपत्ती किंवा दुर्घटनांची दृश्यं दाखवताना त्यावर घटना घडलेल्या तारखेचा उल्लेख करावा अशी मार्गदर्शक सूचना माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं जारी केली आहे. प्रेक्षकांमध्ये गैरसमज पसरू नये यासाठी संबंधित दृश्यं दाखवताना मूळ घटनेची तारीख आणि वेळ ठळकपणे दाखवावी, असं या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं प्रसारण सेवा नियमन विधेयक २०२४ च्या मसुद्यावर अभिप्राय आणि सूचना देण्याची मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत वाढवली आहे, यावर विचारविनिमय करून कायद्याचा नवा मसुदा तयार केला जाईल, असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं म्हटलं आहे. विधेयकाच्या मसुद्यावर विविध संघटनांकडून अनेक शिफारशी, अभिप्राय आणि सूचना प्राप्त झाल्या आहेत, असही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या डहाणू इथल्या प्रकेत पंडित या विद्यार्थ्याला दिल्लीत लाल किल्ला इथं होणाऱ्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाचं आमंत्रण आलं आहे. प्रकेत डहाणूच्या पोंडा महाविद्यालयाचा विद्यार्थी असून त्याने फ्रीडमफायटर या विषयावरच्या निबंधस्पर्धेत भाग घेतल्याबद्दल त्याला हे निमंत्रण मिळालं आहे.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी नवी दिल्लीतल्या भारत मंडमप इथं घरोघरी तिरंगा बाईक रॅलीला आज सकाळी हिरवा झेंडा दाखवला. घरोघरी तिरंगा ही एक चळवळ झाली असून देशातले कोट्यवधी लोक आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावत आहेत, असं उपराष्ट्रपती म्हणाले.

**केंद्रीय गृहमंत्री** अमित शाह आज अहमदाबाद इथं तिरंगा यात्रेला सुरुवात करतील. गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्र यादव हेही या यात्रेत सहभागी होणार आहेत.

घरोघरी तिरंगा अभियाना अंतर्गत पूर्व अहमदाबादच्या विराट नगर इथून ही यात्रा सुरू होणार आहे.

**<><><><><>**

नागपूरमध्ये घरोघरी तिरंगा अभियाना अंतर्गत आज तिरंगा मॅरथॉनचं आयोजन करण्यात आलं होतं. नागपूर महापालिकेच्या सहायक आयुक्तांनी या मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वेरुळ इथं आज शालेय विद्यार्थ्यांनी शंभर फूट तिरंगा घेऊन प्रभातफेरी काढली. तसंच नाशिक महापालिकेतल्या सर्व कर्मचाऱ्यांनी आज महापालिका मुख्यालयात घरोघरी तिरंगा अभियानाची शपथ घेतली.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी ज्येष्ठ अभिनेते योगेश सोमण म्हणाले…

**होल्ड--बाईट - योगेश सोमण**

**<><><><><>**

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात महिला निवासी डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा निषेध नोंदवण्यासाठी देशभरातल्या निवासी डॉक्टरांनी संप पुकारला आहे. फोर्डा या निवासी डॉक्टर संघटनेच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे.

राज्यात विविध सार्वजनिक रुग्णालयांतल्या निवासी डॉक्टरांनी आज काम बंद आंदोलन सुरू केलं. मुंबईत मार्डच्यावतीने सकाळी साडेदहा वाजल्यापासून

केईएम, नायर, सायन कुपर या रुग्णालयांमध्ये आंदोलन सुरू करण्यात आलं आहे. डॉक्टर हत्याप्रकरणी न्याय मिळावा, केंद्रीय तपास यंत्रणे मार्फत चौकशी व्हावी, आदी मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत. सुमारे साडे तीन हजार निवासी निवासी डॉक्टरांनी या आंदोलनात सहभाग घेतला आहे.

**<><><><><>**

राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणारे विविध पुरस्कार जाहीर झाले आहेत. ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना २०२४ सालचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर झाला आहे. भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार आरती अंकलीकर-टिकेकर यांना जाहीर झाला आहे. नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार प्रकाश बुद्धिसागर यांना जाहीर झाला आहे. संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार शुभदा दादरकर यांना जाहीर झाला आहे. संत साहित्यावर लेखन किंवा संतांना अभिप्रेत मानवतावादी कार्याबद्दल ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार संजय महाराज पाचपोर यांना जाहीर झाला आहे. तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव हा पुरस्कार २०२३ या वर्षासाठी शशिकला झुंबर सुक्रे यांच्या नावाची घोषणा झाली असून, २०२४ या वर्षाठीचा पुरस्कार जनार्दन वायदंडे यांना जाहीर झाला आहे.

या पुरस्कारांशिवाय बारा राज्य सांस्कृतिक पुरस्कारांचीही घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे. सर्व पुरस्कारार्थींचे मुनगंटीवार यांनी अभिनंदन केले आहे.

**<><><><><>**

योगगुरु बाबा रामदेव आणि पतंजली आयुर्वेदचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बालकृष्ण यांच्या विरुद्धचा अवमानाचा खटला सर्वोच्च न्यायलयाने बंद केला आहे. दिशाभूल करणाऱ्या जाहिराती केल्याप्रकरणी पतंजली उद्योगाने

न्यायलयात दाखल केलेला माफीनामा आणि वृत्तपत्रांमार्फत प्रसिद्ध केलेली जाहीर माफी याचना न्यायालयाने स्वीकारली आहे. न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती एहसानउद्दीन अमानुल्ला यांच्या पीठासमोर या खटल्याची सुनावणी झाली होती. यापुढे कायद्याचं उल्लंघन करु नये आणि न्यायलयात दिलेल्या वचनपत्राचं पालन करावं अशी समजही न्यायालयाने या दोघांना दिली आहे.

**<><><><><>**

मुंबईत मानखुर्द इथं अहिल्या भवन उभारणार असल्याची घोषणा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज केली. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून हे आंतरराष्ट्रीय दर्जाचं भवन उभारलं जाईल असं ते म्हणाले. त्यासाठी ४७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याचं मंत्री लोढा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते अद्वय हिरे यांना उच्च न्यायालयानं जामीन मंजुर केला असून त्यांची आज नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहातून सुटका होणार आहे. त्यांच्यावर २०१३ मध्ये नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष असताना त्यांनी स्वत:च्या रेणूका सूतगिरीणीचं ज्यादा मुल्यांकन दाखवून कर्ज घेतल्याचा आरोप आहे.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांना कॅबिनेट मत्रीपदाचा दर्जा देण्यात आला आहे, सामान्या प्रशासन विभाग राजशिष्टाचाराच्या २ ऑगस्टच्या निर्णयानुसार हा दर्जा दिल्याची माहिती  राज्य विधानमंडळ सचिवालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

**<><><><><>**

राज्य गुजराती साहित्य अकादमीचा कवी नर्मद पुरस्कार यंदा ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड आणि ईश्वरलाल परमार यांना जाहीर झाला आहे. गुजराती साहित्य अकादमी तर्फे दरवर्षी प्रत्येकी एक मराठी आणि गुजराती साहित्यिकांना कवी नर्मद पुरस्काराने गौरवण्यात येतं. येत्या २४ ऑगस्ट रोजी सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यापूर्वी ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक, मंगेश पाडगावकर, विजया राजाध्यक्ष, आशा बगे या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

//<><><><><>//